**निशाणी क्र.०५ वरील आदेश**

(पारीत दि.१३.०८.२०२५)

०१. वादींनी प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ३९ नियम १ व २ नुसार तात्पुरता मनाई हुकुम मिळण्याकरीता दाखल केला आहे.

०२. अर्ज व जबाबाचे अवलोकन केले. वादींचे असे म्हणणे आहे की, ते मय्यत नानाजी खुटेमाटे यांचे कायदेशीर वारस आहेत. मय्यत नानाजी खुटेमाटे यांचे मालकी व वहीतीमध्ये मौजा चेंडकापूर येथील शेतगट क्र.१०/१, क्षेत्रफळ २.६३ हे. आर. आणि मौजा बाबापूर येथील शेत गट क्र.५०, क्षेत्रफळ ०.९६ हे. आर. व शेत गट क्र.१५०, क्षेत्रफळ ०.३६ हे. आर. ह्या शेतजमीन होत्या. मय्यत नानाजी खुटेमाटे यांचे नावे मौजा बाबापुर येथील शेत गट क्र.५० व १५० ह्या शेतीजमीनी आहेत. परंतु, मौजा चेंडकापुर येथील शेत गट क्र.१०/१ हे प्रतिवादी क्र.१ व २ यांनी संगणमत करून मय्यत नानाजी खुटेमाटे यांचे दि.२८/०१/२०२२ रोजीचे खोटे व बनावटी मृत्यपत्र बनवून प्रतिवादी क्र.१ चे नावाने करून घेतले. मय्यत नानाजी खुटेमाटे यांनी त्यांचे हयातीत कोणतेही मृत्युपत्र प्रतिवादी क्र.१ चे नावाने करून दिले नाही. तसेच, ते मृत्यूपत्र करून देण्याचे शारिरीक व मानसीक स्थितीत नव्हते. ते त्यांचे मृत्यूपर्यंत वादी क्र.१ बरोबर राहत होते. परंतू, त्यांनी कधीही मृत्यूपत्राबाबत उल्लेख केला नाही. त्यामुळे, दि.२८/०१/२०२२ रोजीचे मृत्यूपत्र हे खोटे व बनावटी आहे. त्यामुळे, ते वादींना लागू व बंधनकारक नाही. वादी व प्रतिवादी क्र.२ हे मय्यत नानाजी खुटेमाटे यांचे कायदेशीर वारस असून त्यांचा वाद शेतजमीनीवर समान अधिकार आहे.

०३. वाद शेत गट क्र.१०/१ हे प्रतिवादी क्र.१ चे मालकीत असून तो भविष्यात ती शेती हस्तांतर करू शकतो. तसेच, प्रतिवादी क्र.१ ने वाद शेत गट

क्र.१०/१ हस्तांतरण करून त्रयस्थ संबंध निर्माण केल्यास वादीं त्यांचे कायदेशिर हक्कापासून वंचित राहतील. त्यामुळे प्रतीवादी क्र.१ यांनी वाद शेत गट क्र.१०/१ मध्ये कोणताही त्रयस्थ संबंध निर्माण करू नये, म्हणून त्याचेविरुद्ध तात्पुरता मनाई हुकुम पारित होणे आवश्यक आहे. वादींचा अर्ज मंजूर झाला नाही तर, त्यांचे कधीही भरून न निघणारे नुकसार होईल. याउलट अर्ज मंजूर झाल्यास प्रतीवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. शेवटी, त्यांनी अर्ज मंजुर करण्याची विंनती केली.

०४.        प्रतिवादींनी नि.क्र.१३ नुसार अर्जास म्हणणे दाखल करुन प्रखर विरोध केला आहे. प्रतिवादींनी पुढे कथन केले आहे की, वादींनी मामल्यासंबंधीचे महत्वाचे तथ्य न्यायालयापासुन लपवुन ठेवली आहेत. मयत नागो रामा खुटेमाटे यांनी त्यांचे मालकीची मौजा चेंडकापूर, येथील शेतगट क्र.१०/१, ही शेतजमीन त्यांचा नातु नानाजी शंकर खुटेमाटे यांना दि.२३/०४/१९६० रोजी बक्षिसपत्राद्वारे बक्षिस दिली. त्यानुसार नानाजी शंकर खुटेमाटे हे सदर शेतगट क्र.१०/१ चे एकमेव मालक झाले. त्यामुळे, त्यांना सदर मालमत्तेची विल्हेवाट लावण्याचा पुर्ण कायदेशीर हक्क व अधिकार होता. त्यानुसार त्यांनी त्यांचे हय्यातीत शेत गट क्र.१०/१ चे त्यांचे इच्छेनुसार दि.२८/०१/२०२२ रोजी नोंदणीकृत मृत्युपत्र लिहुन ठेवले. दि.१७/१०/२०२३ रोजी नानाजी शंकर खुटेमाटे हे वृध्दापकाळाने प्रतिवादींचे घरी मरण पावले. त्यानंतर दि.२८/०१/२०२२ रोजी प्रतिवादी क्र.१ ने संबंधीत तलाठी यांचेकडे नोंदणीकृत मृत्युपत्राआधारे फेरफाराची नोंदी करिता अर्ज केला. वादींनी त्याबाबत आक्षेप नोंदविला. त्यावर मंडळ अधिकारी, कायर यांनी सुनावणी घेऊन प्रतिवादी क्र.१ चा फेरफार मंजुर केला. परंतु, वादींनी त्याचे अधिवक्ता यांचेमार्फत पाठविलेल्या सुचनापत्रात आणि वादपत्रात यासंबंधीचा संपुर्ण मजकुर हेतुपुर्वक लपवून ठेवला आहे. वादींनी त्या आदेश व फेरफाराविरुद्ध वरिष्ठ महसूल कार्यालयात

अपील केले नाही. प्रतिवादी क्र.१ हा नोंदणीकृत मृत्युपत्राचे आधारे शेत गट क्र.१०/१ चा मालक झाला. त्यामुळे वादींना त्याचे मालकी हक्कास व ताब्यास आक्षेप घेण्याचा कुठलाही नैतिक व कायदेशीर अधिकार नाही.

०५. मयत नानाजी शंकर खुटेमाटे हे जिवंत असतांना प्रतिवादींनी त्यांची सर्व सेवा सुश्रुशा केली. त्यामुळे नानाजी खुटेमाटे यांनी त्यांची स्वअर्जीत शेतजमिनीचे नोंदणीकृत मृत्युपत्र प्रतिवादी क्र.१ चे हक्कात व अधिकारात करून दिले. मयत नानाजी शंकर खुटेमाटे हे मरणाचे तीन दिवस पुर्वीपर्यंत सुदृढ होते, चालत फिरत होते व त्यांना सर्व गोष्टी समजत होत्या व दिसत होत्या. तसेच त्यांची सदसद्विवेकबुद्धी चांगली होती. वादींनी प्रतिवादींना शारिरीक, मानसिक व आर्थीक त्रास देण्याचे उद्देशाने व गट क्र.१०/१ चे मालकीस व ताब्यास त्रास देणेकरीता वाईट हेतुने सदरचा अर्ज दाखल केला आहे. दि.०४/०३/२०२४ रोजी प्रतिवादींनी वादींना नोटीस उत्तर पाठवुन प्रतिवादी क्र.१ चे शेत गट क्र.१०/१ चे मालकी, ताबा व वहितीस कुठलाही अडथळा निर्माण करू नये असे कळविले. त्यानंतर, देखील त्यांनी प्रतिवादीविरूध्द खोटा दावा दाखल केला आहे.

०६. मय्यत नानाजी शंकर खुटेमाटे यांचे नावाने मौजा बाबापूर येथे शेत गट क्र.५० व १५० याव्यतिरिक्त गट क्र.१८ क्षेत्रफळ २.०० हे. आर ही शेतजमिनी आहे आणि ती आजही वादी क्र.२ ते ६ यांचे ताब्यात आहे. गट क्र.५० ही वादी क्र.१ चे ताब्यात असून गट क्र.१५० ही गांवठाणमध्ये गेली आहे. वरील शेत जमीनीमध्ये प्रतिवादी क्र.२ चा १/३ हिस्सा आहे. परंतु, वादींनी त्यांचे वादपत्रात त्याबाबत कोणताही मजकुर नमुद केला नाही. वादीनी वादपत्रात व अर्जात नमुद केलेला संपुर्ण मजकुर खोटा आहे. त्यामुळे दाव्याचा व अर्जाचा निकाल त्यांचे बाजुने लागण्याची शक्यता नाही. तसेच कायद्याचे झुकते माप सुध्दा वादींचे बाजुने नाही. त्याचप्रमाणे

वादींचा दावा सुध्दा प्रथमदर्शनी खरा नाही. सबब, सदरचा अर्ज खारीज होण्यास पात्र आहे. शेवटी, त्यांनी अर्ज खारीज करण्याची विनंती केली.

०७. दोन्ही पक्षांचे विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी अर्ज व जबाबातील कथनांप्रमाणे आपला युक्तिवाद सादर केला.

०८. अर्ज व जबाबातील कथनांवरुन माझ्यासमक्ष खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादींचे हक्कात सकृतदर्शनी केस आहे काय ? | **...नाही.** |
| २. | वादींचे बाजुने न्यायाचा समतोल आहे काय ? | **...नाही.** |
| ३. | सदर अर्ज नाकारल्यास वादींची अपरिमित हानी होईल काय ? | **...नाही.** |
| ४. | आदेश काय ? | **...अर्ज नामंजुर करण्यात येतो.** |

०९. वादींनी अर्जासोबत गट क्र.१०/१, ५० व १५० चे ७/१२ उतारे, नानाजी व विनोद यांचे मृत्यू प्रमाणपत्र, वारसाचा दाखला, मृत्यूपत्र, मंडळ अधिकारी यांचा आदेश, फेरफार, नोटीस, पोस्टाची पावती, नोटीस उत्तर ई. दस्त दाखल केले आहेत. याउलट प्रतिवादींनी गट क्र.१८, हक्क नोंदणी व फेरफार क्र.६९ इ. दस्त दाखल केले आहेत.

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ करीता –</u>**

१०. वरील मुद्दे हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे, मी त्यांचे विवेचन एकत्रीत करीत आहे. अर्ज व जबाबातील कथनांवरुन अभिलेखावर वाद मालमत्ता गट

क्र.१०/१ चे मालकी हक्काबाबत वाद उपस्थित झाला आहे. वादींनी असे कथन केले आहे की, प्रतिवादींनी मयत नानाजी खुटेमाटे यांचे खोटे व बनावटी मृत्यूपत्र तयार केले आणि गट क्र.१०/१ प्रतिवादी क्र.१ चे नावे करून घेतले. याउलट प्रतिवादींनी असे कथन केले आहे की, नानाजी खुटेमाटे यांनी त्यांचे इच्छेनुसार प्रतिवादी क्र.१ चे नावे मृत्यूपत्र करून दिले आहे. त्यामुळे मृत्यूपत्र कायदेशीर आहे.

११. अभिलेखावर सदरचे मृत्यूपत्राची प्रत दाखल आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचे मृत्यूपत्र ही नोंदणीकृत आहे. तसेच, मयत नानाजी खुटेमाटे यांची देखभाल प्रतिवादी क्र.१ ने केली. त्यामुळे त्यांनी त्यांचे मालकीची मौजा चेंडकापुर येथील गट क्र.१०/१ या शेतीचे मृत्यूपत्र प्रतिवादी क्र.१ चे नावे करून ठेवले. त्याचप्रमाणे, सदर मृत्यूपत्र करतेवेळी नानाजी खुटेमाटे यांची शारीरिक व मानसिक स्थिति चांगली होती. तसेच त्यांना चांगली समज होती, चांगले दिसत होते आणि ते चालत-फिरत होते. ते मृत्यूपत्र हे नानाजी खुटेमाटे यांचे शेवटचे मृत्यूपत्र होते आणि ते त्यांनी त्यांचे इच्छेनुसार करून ठेवले होते. सदर मृत्युपत्र हे खोटे व बनावटी आहे, हे सिद्ध करण्यासाठी पुराव्याची आवश्यकता आहे. अशा परिस्थितीमध्ये सद्यस्थीतीला सदरचे मृत्यूपत्र हे खोटे व बेकायदेशीर आहे, असे म्हणता येत नाही.

१२. अभिलेखावरील दाखल कागदपत्रावरून असे दिसून येते की, नानाजी खुटेमाटे यांचे मृत्यूनंतर उपरोक्त मृत्यूपत्राअधारे प्रतिवादी क्र.१ ने गट क्र.१०/१ चे महसूल अभिलेखावर त्याचे नाव नोंद करण्यासाठी तलाठ्याकडे अर्ज केला. त्यास वादींनी आक्षेप घेतला. त्यावरून, ते प्रकरण मंडळ अधिकारी, कायर यांचे पुढे चालविण्यात आले. त्यावर मंडळ अधिकारी, कायर यांनी आदेश पारित करून वादीचा आक्षेप खरीज केला आणि प्रतिवादी क्र.१ चे नाव गट क्र.१०/१ वर नोंद

केले. अश्याप्रकारे नानाजी खुटेमाटे यांचे मृत्यूनंतर प्रतिवादी क्र.१ हा गट क्र.१०/१ चा मालक झाला आहे. मला या ठिकाणी नमूद करावेसे वाटते की, वादींनी मंडळ अधिकार, कायर याचे आदेशाविरुद्ध किंवा त्यांनी नोंदविलेल्या फेरफाराविरुद्ध कुठे अपील केले नाही. त्यामुळे तो आदेश व फेरफार यास अंतिम स्वरूप प्राप्त झाले आहे. वर कथन केल्याप्रमाणे वादातील मृत्यूपत्र हे नोंदणीकृत आहे. सबब, त्यास कायदेशीर महत्व आहे. त्याचे कायदेशीर महत्व या अर्जाचे निकालावेळी ग्राह्य धरणे उचीत ठरते.

१३. वादींनी त्यांचे वादपत्रामध्ये तलाठी व मंडळ अधिकारी यांनी त्यांना फेरफार घेण्यापुर्वी सुचना दिली नाही आणि तो फेरफार खोट्या दस्ताचे आधारे घेतल्याचे कथन केले आहे. परंतु, वादींनी स्वतः दाखल केलेले दस्त क्र.०८ वरील मंडळ अधिकारी, कायर यांचे आदेशाचे अवलोकलन केले असता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र.१ ने गट क्र.१०/१ बाबत फेरफार घेण्यासाठी अर्ज केला असता, वादींनी त्यास आक्षेप घेतला. त्यामुळे, ते प्रकरण मंडळ अधिकारी, कायर यांचे वर्ग करण्यात आले. मंडळ अधिकारी, कायर यांची वादीं व प्रतिवादी क्र.१ यांचे म्हणणे ऐकुन प्रतिवादी क्र.१ च्या नावे फेरफार रुजु केला. यावरुन असे दिसुन येते की, तलाठी व मंडळ अधिकारी यांनी वादींना फेरफाराबाबत सुचना दिली होती. परंतु, वादींनी त्याबाबतचा मजकुर जानुणबुजुन त्यांचे वादपत्र व सदरचे अर्जामध्ये नमुद केला नसल्याचे दिसुन येते. सबब, वादीं हे न्यायालयासमक्ष स्वच्छ हाताने आले नाहीत, ही बाब सिद्ध होते. त्यामुळे, सदरचा अर्ज ह्या एकमेव कारणांवरुन खारीज करण्यास पात्र आहे.

१४. अभिलेखावर दाखल असलेले कागदपत्रावरुन प्रतिवादी क्र.१ हा गट क्र.१०/१ या शेतजमिनीचा प्रथमदर्शनी मालक व ताबेदार असल्याचा दिसुन येतो.

त्यामुळे, वादीचे बाजुने प्रथमदर्शनी केस दिसुन येत नाही. तसेच सोईचे पारडे देखील वादींचे बाजुने नाही. अशा परिस्थीतीमध्ये प्रतिवादींविरुध्द आदेश पारीत केल्यास त्यांचे कधीही भरुन न निघणारे नुकसान होईल. याउलट अर्ज नामंजुर केल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. म्हणुन, उपरोक्त निष्कर्षावरुन मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.४ करीता –**

१५. मी मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी दिल्यामुळे प्रस्तुत अर्ज खारीज होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष लक्षात घेता, मी मुद्दा क्र.४ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे,

**आदेश**

०१. अर्ज खारीज करण्यात येतो.

०२. खर्चाबाबत आदेश नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SHAHAJI DATTARAO BHOSLE

**(शहाजी द.भोसले)**

दिनांक-१३/०८/२०२५　　　　　　सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, वणी

मी, अभय प्रमोद भोयर, लघुलेखक (सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) तथा न्यायदंडाधिकारी, (प्र.श्रे.), वणी) याची पुष्टी करतो की, या पी.डी.एफ. ची सामग्री ही मुळ न्यायनिर्णयाच्या शब्दाप्रमाणेच शब्द आहे.